दै. गोदातीर दि. 24.01.25

# नागरिकांनी नवीन कायदे जाणून घेण्याची गरज

## ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांचे प्रतिपादन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – भारतात नवीन कायद्यांचा अंमल सुरु झाला आहे. या कायद्यांतर्गत होणारे पोलीस विभागाचे काम तसेच नवीन कायद्यांची सविस्तर माहिती प्रत्येक नागरिकाने जाणून घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले. येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात दि. २२ जानेवारी रोजी नवीन कायदेविषयक माहितीपर कार्यशाळा घेण्यात आली. तीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, सौ. रेखा काळे, उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण ॲड.भास्कर हस्सेकर, ॲड. वैष्णवी कोथळकर यांची उपस्थिती होती. ॲड.भास्कर हस्सेकर यांनी भारतीय नागरिक न्याय संहिता, यासह अन्य नवीन कायदा बाबत मार्गदर्शन केले. यात आरोपी समन्स, पोलीस कोठडी, न्यायालय कोठडी, महिला अत्याचारांच्या बाबतीत दाखल झालेल्या गुन्ह्या संदर्भाने माहिती दिली व कायद्यांची माहिती जाणून घेण्याचे आवाहन केले. ॲड. वैष्णवी कोथळकर यांनी कायदा संदर्भात मार्गदर्शन करून महिला कायदा बाबत सविस्तर माहिती दिली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सौ. रेखा काळे यांनी महिला अत्याचारांच्या संदर्भात विविध कायद्यांची माहिती दिली. महिला पोलीस पाटील व पोलीस पाटील यांनी आपापल्या गावात नवीन कायदे संदर्भात अशा कार्यशाळा आयोजीत करून ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याते आवाहन केले. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, पोलीस कर्मचारी म उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वीतेसाठी गोपनिय शाखेचे पोलिस अंमलदार बालाजी दंतापल्ले, बालासाहेब करके, ज्योती कंधारे यांनी परिश्रम घेतले.